## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ४१/२०२०** | **दिनांक २२/०५/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १६/०५/२०२० ते २२/०५/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २३/०५/२०१९ सकाळी ८:३० पासून २७/०५/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६/०५ | १७/०५ | १८/०५ | १९/०५ | २०/०५ | २१/०५ | २२/०५ | | २३/०५ | २४/०५ | २५/०५ | २६/०५ | २७/०५ |
| ० | ० | ० | ० | ० | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| - | ३६.४ | ३६.० | ३५.८ | ३६.२ | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३६ | ३६ | ३८ | ३९ | ३९ |
| २२.८ | २३.८ | २२.८ | - | २२.८ | - | - | किमान तापमान (अं.से) | २४ | २४ | २५ | २५ | २६ |
| ४ | ६ | ० | ० | ० | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | १ | २ | १ | ० | ० |
| ८३ | ९० | ८८ | - | ५२ | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८९ | ८६ | ८० | ७७ | ६१ |
| - | ७६ | ७० | ७० | ४७ | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४२ | ३५ | ३१ | ३४ | ४० |
| ३.७ | ० | ० | ० | ३.७ | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ४ | ४ | ४ | ५ | ५ |
| प. | शांत | शांत | शांत | आ. | - | - | वाऱ्याची दिशा | नै. | नै. | प. | नै.प. | नै.प. |

### हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २३ ते २७ मे २०२० दरम्यान कमाल व किमान तापमानात वाढ संभवत असून आकाश निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **कोविड-१९ बाबत शेतकऱ्यांनी घ्यावयाची दक्षता** | | • कोरोना विषाणूचा संसर्ग प्रतिबंधित करण्यासाठी शेतीतील कामे करताना, शेतीसाठी आवश्यक खरेदी आणि विक्री करताना स्वच्छता व सुरक्षिततेच्या खबरदारीच्या उपाययोजनांचे पालन करावे. |
| **खरीप भात** | **रोपवाटिका पूर्वतयारी** | • भात रोपवाटीका तयार करावयाच्या क्षेत्रामध्ये जमीन नांगरून ढेकळे फोडावीत. प्रती गुंठा क्षेत्रास १०० किलो शेणखत जमिनीत मिसळावे. जमिनीचा उतार लक्षात घेऊन, उंच निचऱ्याच्या जागी तळाशी १२० सें.मी. व पृष्ठभागी ९० सें.मी. रुंदीचे, ८ ते १० सें. मी. उंचीचे उतारानुसार योग्य त्या लांबीचे गादीवाफे तयार करावेत. एक एकर क्षेत्रावरील पुर्नलागवडीसाठी रोपवाटिका चार गुंठे क्षेत्रावर तयार करावी.<br>• जाड दाण्याच्या जातीसाठी एकरी २० ते २४ कि.ग्रॅ., बारीक व अतिशय बारीक दाण्याच्या जातीसाठी एकरी १४ ते १६ कि.ग्रॅ. आणि संकरीत जातीसाठी एकरी ८ कि.ग्रॅ. बियाणे वापरावे. भाताची लागवड रहू पध्दतीने करावयाची असल्यास बारीक दाण्यांच्या जातीसाठी ३२ किलो आणि जाड दाण्यांच्या जातीसाठी ४० किलो बियाणे प्रति एकरी वापरावे. |
| **आंबा** | **फळधारणा** | • काढणीस तयार असलेल्या सर्व आंबा फळांची काढणी चौदा आणे (८० ते ८५ टक्के) पक्वतेला देठासह सकाळी १० वाजेपर्यंत किंवा संध्याकाळी ४ नंतर करावी. उष्णतेमुळे फळांचे तापमान वाढून साक्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने आंब्याची फळे काढल्यानंतर लगेचच सावलीमध्ये ठेवावीत तसेच आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी. फळे काढणीच्या किमान १५ दिवस अगोदर झाडावर कोणतीही फवारणी करू नये.<br>• फळकूज ह्या काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी काढणी नंतर लगेचच फळे ५२ अं.सें. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर फळे पिकविण्यासाठी ठेवावीत.<br>• आंबा बागेत फळमाशी तसेच फळे पोखरणारी अळी इ. किडीच्या प्रादुर्भावामुळे गळलेली फळे वेळोवेळी गोळा करून नष्ट करावीत व बागेत स्वच्छता ठेवावी.<br>• आंबे काढून झाल्यावर बांडगुळे व वाळलेल्या फांद्या काढून झाडे स्वच्छ करावीत. बांडगुळे मोठी असल्यास फांद्यासह कापून काढावीत आणि कापलेल्या भागांवर बोर्डोपेस्ट किंवा डांबर लावावे.<br>• आंब्यांच्या झाडावर खोड किडीचा प्रादुर्भाव झाडाचे खोड व फांद्यावर दिसून येतो ही कीड फांद्या पोखरत असल्याने पोखरलेल्या फांद्या वाळू लागतात. किडीच्या सर्वेक्षणासाठी बागेतील झाडांची नेहमी पाहणी करावी. किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी तारेच्या हुकाने खोडातील अळ्या काढून टाकून छिद्रात प्रवाही क्लोरपायरीफॉस २० टक्के १० मि. ली. + ५० मि. ली. रॉकेलचे मिश्रण इंजेक्शनच्या सहाय्याने ओतावे आणि छिद्र बुजवून घ्यावे. झाडाला कोणत्याही प्रकारे इजा करू नये व इजा झाल्यास त्याला बोर्डो पेस्ट लावून जखम झाकावी.<br>• आंब्यांच्या झाडावर खोड किडीचा प्रादुर्भाव झाडाचे खोड व फांद्यावर दिसून येतो ही कीड फांद्या पोखरत असल्याने पोखरलेल्या फांद्या वाळू लागतात. किडीच्या सर्वेक्षणासाठी बागेतील झाडांची नेहमी पाहणी करावी. किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी तारेच्या हुकाने खोडातील अळ्या काढून टाकून छिद्रात प्रवाही क्लोरपायरीफॉस २० टक्के १० मि. ली. + ५० मि. ली. रॉकेलचे मिश्रण इंजेक्शनच्या सहाय्याने ओतावे आणि छिद्र बुजवून घ्यावे. झाडाला कोणत्याही प्रकारे इजा करू नये व इजा झाल्यास त्याला बोर्डो पेस्ट लावून जखम झाकावी. |
| **नारळ** | - | • नवीन लागवड केलेल्या नारळ बागेमध्ये पावसाळ्यात लहान रोपांना कोंब कुजणे या बुरशीजन्यरोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. या रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी झाडाच्या कोंबानजीकच्या |

| | | |
|---|---|---|
| | | गाभ्यावर पावसाळ्यापूर्वी करावी.<br>• तापमानात वाढ व आर्द्रतेत घट संभवत असल्याने नारळ बागेस ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **चिकू** | - | • चिकू फळांची पावसाळ्यात बुरशीजन्य रोगामुळे होणारी फळगळ नियंत्रणासाठी सुकलेल्या व रोगट फांद्या कापून त्याजागी १ टक्का बोर्डोपेस्ट लावावी व पावसाळ्याच्या अगोदर १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. पुढील दोन फवारण्या १५ ते २० दिवसांच्या अंतराने कराव्यात.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नवीन लागवड केलेल्या चिकू बागेत ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | - | • जनावरांना फऱ्या रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्वजनावरांना लसीकरण करून घ्यावे. |
| **कुकुटपालन** | - | • ४ ते ५ दिवसांच्या पिल्लांना रानीखेत रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |